**८) महामंडळाच्या कामाकाजाचा भाग म्हणून अथवा त्यासंदर्भात सल्ला देण्यासाठी दोन अथवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींचा समावेश असलेल्या मंडळ, परिषद समिती व अन्य यंत्रणा इ. चा तपशील या मंडळ, परिषद, समिती व अन्य यंत्रणांच्या बैठका जनतेसाठी खुल्या असतात का ? अथवा या बैठकांचे इतिवृत्त जनतेसाठी उपलब्ध असतात काय ?**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील सार्वजनिक उपक्रम असून महामंडळाच्या दैनंदिन कामकाजामध्ये सहाय्यभूत ठरण्याच्या दृष्टीने खालील समित्या स्थापना करण्यात आलेल्या आहेत.

| | |
|---|---|
| **१) तांत्रिक सल्लागार समिती** | - आवश्यकतेनुसार एखाद्या विशिष्ट प्रकल्पासंदर्भात तांत्रिक सल्ला देण्यासाठी महामंडळाबाहेरील त्या त्या क्षेत्रातील तज्ञांची समिती गठित करण्यात येते. |
| **२) कंत्राटदारांच्या मागण्यासंबधीची समिती** | - कंत्राटदारांनी देयकांसदर्भात केलेल्या मागण्यांवर विचार करुन त्यावर निर्णय घेण्यासाठी ही समिती गठित करण्यात आली आहे. |
| **३) निविदा समिती** | - प्रकल्पांसाठी प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर कार्यवाही करण्यासाठी ही समिती गठित करण्यात आली आहे. |
| **४) तज्ञ समिती** | -प्रकल्पांच्या महत्वाच्या टप्प्यासंबंधी दिशा दिग्दर्शन करण्यासाठी तसेच शिफारशी करण्यासाठी ही समिती गठित करण्यात येते. सर्वसाधारणपणे यामध्ये विविध क्षेत्रातील तज्ञांचा समावेश असून ते त्रयस्थ म्हणून महामंडळास सल्ला देतात. |

वरील समित्यांनी त्यांची मते/शिफारशी महामंडळास दिल्यानंतर महामंडळ त्यावर स्वतंत्रपणे निर्णय घेते.

या समित्यांच्या बैठकातील सहभाग आणि त्याची इतिवृत्ते जनसामान्यांसाठी खुली नाहीत.